पनवेल(प्रतिनिधी) सात महिन्यापूर्वी लक्ष्मण जगतापना राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून मावळ लोकसभा मतदार संघाच्या उमेदवारीसाठी हिरवा कंदिल देण्यात आला होता मात्र लक्ष्मण जगताप यांच्या पोटात काळे होते म्हणुनच त्यांनी शेकापक्षाशी साटेलोटे केले. शरद पवारसाहेबांना सोडून साडेतीन तालुक्यापुरता मर्यादित असलेल्या शेकापच्या जयंत पाटलांसोबत जगताप गेले, मतदारराजा सुज्ञ आहे, म्हणूनच विश्वासघातकी लक्ष्मण जगताप यांना मतदार धूळ चारेलच त्याचबरोबर जयंत पाटलांचा आश्रय लक्ष्मण जगतापना निराधार केल्याशिवाय राहणार नाही, असा टोला राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष भास्करराव जाधव यांनी लक्ष्मण जगताप तसेच शेकापला पनवेल येथे लगावला.

कॉंग्रेस आघाडीचे मावळ लोकसभा मतदार संघातील उमेदवार ॲड. राहुल नार्वेकर यांच्या पनवेल येथील प्रचार कार्यालयाचे उदघाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष भास्करराव जाधव यांच्या हस्ते कॉंग्रेस आघाडीच्या जयघोषात झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

भास्करराव जाधव पुढे म्हणाले की, देशात सर्व धर्म सम भाव टिकवून ठेवण्याचे काम कॉंग्रेस आघाडी करीत असून कॉंग्रेस आघाडी सरकार तळागाळातील शेवटच्या घटकापर्यंतच्या माणसाकरिता काम करीत आहे. विविध लोककल्याणकारी योजना राबवून न्याय देण्याचा काम आघाडीने केले आहे. तर दुसरीकडे भाजप-शिवसेनेची महायुती जाती धर्माच्या नावाने राजकारण करून मते मागत आहे असे सांगून त्यांनी महायुतीच्या नेत्यांची आपल्या भाषणातून चांगलीच टेर खेचली. आमची महायुती- आमची महायुती ओरडत फिरणारी महायुतीतल्या नेत्यांना त्यांच्यातील लोकांची भिती वाटू लागली आहे. आधी होती शिवसेना व भाजपची युती त्यात सोयीनुसार वाढले रामदास आठवले त्यानंतर राजू शेट्टी. या महायुतीत कोणाचाही कोणाशीही तालतंत्र नाही, विकासाचे धोरण नसलेली ही फक्त कागदावरची पंचभूतांची महायुती आहे, असा टोलाही जाधव यांनी महायुतीला लगावला. राज्यात भाजप महायुतीची केविलवाणी परिस्थिती आणि केंद्रातही तीच दुर्देवी अवस्था आहे. नमो चा नारा देणारे नरेंद्र मोदी हिटलरप्रमाणे काम करीत आहे म्हणूनच त्यांची हवा कधीच निघून गेली आहे. आता नको मोदी म्हणून जनता तसेच स्वतः भाजपचे नेते लालकृष्ण आडवाणी, सुषमा स्वराज, जसवंत सिंग यांनी नरेंद्र मोदींच्या पंतप्रधानपदाच्या उमेदवारीला स्पष्ट नकार दिला आहे त्यामुळे भाजपलाच नरेंद्र मोदी नको मग इतरांचा प्रश्न उरलाच नाही. असेही ते म्हणाले. भास्करराव जाधव यांनी यावेळी लक्ष्मण जगताप यांचा विश्वासघातकी असा उल्लेख करून त्यांच्यावर टिकेची झोड उठवली तसेच पिंपरी-चिंचवडमधील अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्यासाठी लक्ष्मण जगताप यांचा ओढा आहे. अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्यामागे लक्ष्मण जगताप यांना का सारस्य आहे. त्यांची तर ही अनधिकृत बांधकामे नाहीत ना किंवा त्यांच्या महापौर पदाच्या काळात ही अनधिकृत बांधकामे झालेत का असा सवालही त्यांनी उपस्थित केला. यावेळी भास्कर जाधव यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्याचा गौरव केला. विकास बघायचा असेल तर पनवेलमध्ये बघा, कार्यक्षम आमदार प्रशांत ठाकूर यांनी विकासाची गंगा आणली आहे असे सांगून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या रूपाने सामाजिक आणि लोकांची जाण असेलला लोकप्रतिनिधी व कोकणाला तरूण तडफदार नेतृत्व मिळाले असल्याचेही त्यांनी सांगितले. कॉंग्रेस आघाडीला उत्तम वातावरण असून राज्यात किमान ३५ जागांवर निश्चित विजय मिळेल अशी आशा त्यांनी व्यक्त करून ॲड. राहुल नार्वेकरांना भरघोस मतांनी विजयी करा असे आवाहनही जाधव यांनी केले.

माजी खासदार लोककनेते रामशेठ ठाकूर यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, कॉंग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सोनिया गांधी, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, युवा नेते राहुल गांधी यांच्या दृष्टीकोनातून सर्व समाजातील घटकांना सोबत घेवून 'मी नाही आपण' अशी संकल्पना राबविली जात आहे. तर दुसरीकडे भाजपचे नरेंद्र मोदी 'फक्त मी' अशी आरोळी ठोकून वल्गना करीत आहे, म्हणूनच धर्माच्या नावाने राजकारण करणारे नरेंद्र मोदी प्रचारात मागे पडले आहेत, असेही त्यांनी म्हंटले. कॉंग्रेस आघाडीच्या उमेदवारांचे बुधवारी अर्ज दाखल केल्यानंतर पुणे येथे झालेल्या सभेत मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार आदी मान्यवरांच्या मार्गदर्शनामुळे आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य पसरले आहे. आघाडीला पोषक असे वातावरण असल्यामुळे केंद्र व राज्यात पुन्हा एकदा कॉंग्रेस आघाडी वर्चस्व सिध्द करून सत्ता मिळवेल असे सांगून मावळ लोकसभा मतदार संघातील कॉंग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडीचे उमेदवार ॲड. राहुल नार्वेकर एक लाख मतांच्या फरकाने विजयी होतील फक्त त्यासाठी आघाडीच्या प्रत्येक कार्यकर्त्याने सतर्क राहून काम करावे, असे आवाहन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केले.

यावेळी माजी खासदार अशोकराव मोहोळ यांनी आपल्या भाषणातून काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रचार आघाडीमुळे विरोधकांचे धाबे दणाणले असल्याचे सांगून आघाडीने केलेल्या विकासकामांचा आढावा विषद केला.

रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आर.सी.घरत यांनी म्हंटले की, काँग्रेस आघाडीने राबविलेल्या योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचली पाहिजे. काँग्रेस आघाडीला मत म्हणजेच देशाच्या विकासाला मत आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने सक्रीय रहावे असे आवाहनही त्यांनी केले. देशपातळीवरचे राजकारण माहिती नसताना व साडेतीन तालुक्यापुरता उरलेल्या आणि स्वतःला अखिल भारतीय शेतकरी कामगार पक्ष म्हणवून घेणाऱ्या शेकापला उमेदवार मिळाले नाहीत म्हणून त्यांनी बाहेरून उमेदवार उभे केले ते सुध्दा दोनच याच्यावरून शेकापची बिकट अवस्था दिसून येत असून केविलवाणे होवून मते मागतानाही ते दिसत आहेत, असा टोलाही आर.सी.घरत यांनी शेकापला लगावला.

अल्पसंख्यांकाचे नेते हबिब फकी म्हणाले की, महाराष्ट्र आणि गुजरातच्या विकासात मोठया प्रमाणात फरक आहे. वस्तूतः गुजरातपेक्षा महाराष्ट्र राज्य विकासात आघाडीवर आहे. औद्योगिक व विकास क्षेत्रात महाराष्ट्र नंबर वनला तर गुजरात सहाव्या कमांकावर आहे.काँग्रेस आघाडी विकासाच्या मुद्यावर तर भाजप धर्माच्या नावावर मते मागत आहे. गुजरातमध्ये वीज व इतर सुविधा शहरापर्यंत मर्यादित राहिली आहे आदिवासी वाडया, गाव खेडयात नरेंद्र मोदी पोहोचलेत नाही, असेही त्यांनी म्हंटले.

काँग्रेस-राष्ट्वादी काँग्रेस आघाडीचे उमेदवार ॲड.राहुल नार्वेकर हे सुशिक्षित उमेदवार आहेत, त्यामुळे ज्येष्ठांच्या आशिर्वादाने आणि युवक व महिलांच्या ताकदीच्या जोरावर ते प्रचंड मताने निवडून येतील असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रास्ताविकातून व्यक्त केला. देश एकसंघ राहिला पाहिजे या दृष्टीकोनातून काँग्रेस आघाडी काम करीत आहे. आघाडीने केलेल्या कामाच्या जोरावर पुन्हा काँग्रेस आघाडीचेच सरकार असेल असे सांगून पनवेल, उरण विभागातून ३५ हजार मतांची आघाडी ॲड.राहुल नार्वेकर यांना मिळेल असेही ते म्हणाले.

कामगार नेते शाम म्हात्रे यांनीही आपल्या भाषणातून शेकापक्षाच्या मनमानी कारभाराचा खरपूस समाचार घेतला. शेकाप सोयीनुसार राजकारण करीत असल्याचेही त्यांनी म्हंटले. तसेच राहुल नार्वेकर यांना निवडूण देणे काळाची गरज आहे, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यकमास सिडकोचे अध्यक्ष प्रमोद हिंदुराव, मुनाफ हकीम, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष वसंत ओसवाल, आमदार किरण पावस्कर, आमदार नरेंद्र पाटील, कामगार नेते गुलाबराव जगताप, निरिक्षक रविंद्र पवार, रायगड जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष जी.आर.पाटील, पनवेल तालुकाध्यक्ष लक्ष्मणशेठ पाटील, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अनंता पाटील, नगराध्यक्षा चारूशिला घरत, इंटकचे प्रदेश कार्याध्यक्ष महेंद्र घरत, प्रदेश काँग्रेसचे सदस्य अरूणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, शहर कार्याध्यक्ष अरविंद सावळेकर, युवा नेते परेश ठाकूर, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भीमसेन माळी, शहर अध्यक्ष सुनिल घरत,उपनगराध्यक्ष मदन कोळी, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक संतोष शेट्टी, गणेश पाटील, बांधकाम सभापती राजू सोनी, महिला व बाल कल्याण सभापती नीता माळी, जिल्हा चिटणीस के.एस.पाटील, शहर प्रवक्ते शशिकांत बांदोडकर, अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश बिनेदार, महिला काँग्रेसच्या शहर अध्यक्षा वर्षा नाईक, मावळ लोकसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष किशोर चौतमोल, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष अमीर सय्यद, ग्राहक हित कक्षाच्या तालुकाध्यक्षा दर्शना भोईर, एनएसयुआयचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, राष्ट्रवादीचे नेते उत्तमराव गायकवाड, शिवदास कांबळे, भिमकांत पाटील, सुभाष पाटील, आरपीआय(डेमोकेटिक) जिल्हाध्यक्ष महेश साळुंके, पनवेल तालुकाध्यक्ष प्रणित पवार, शहर अध्यक्ष मनोज कांबळे, नवनि पनवेल अध्यक्ष अशोक रणपिसे यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका, विभागीय अध्यक्ष आणि प्रमुख कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.कार्यकमाचे सुत्रसंचालन प्रविण मोहोकर यांनी तर आभार प्रदर्शन शिवदास कांबळे यांनी केले.